आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

मंगळवार दिनांक १४ एप्रिल २०२६

ठळक बातम्या

- भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना १३५व्या जयंतीनिमित्त देशभरातून अभिवादन.
- विदर्भात ठिकठिकाणी विविध कार्यक्रमांतून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना नमन.
- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उद्यापासून दोन दिवसांच्या विदर्भ दौऱ्यावर.
- राज्यातील अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या अनुषंगानं निवेदन सादर करण्यासाठी ३० एप्रिल २०२६ पर्यंत मुदतवाढ.
- अकोल्यात आज ४४ अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद.

डॉ.आंबेडकर जयंती

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना त्यांच्या जयंती निमित्त आज देशभरात अभिवादन करण्यात येत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गुजरातमधल्या गांधीनगर इथं लोकभवनात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहिली. उपराष्ट्रपती सी.पी.राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिरला, राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांच्यासह अन्य केंद्रीय मंत्री आणि खासदारांनी संसद परिसरातल्या प्रेरणा स्थळावर बाबासाहेबांना आदरांजली अर्पण केली. समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या तत्त्वांप्रती बाबासाहेबांची अखंड बांधिलकी त्यांच्या जीवन कार्यातून स्पष्ट होते. त्यांच्या दूरदृष्टीतून आणि महान योगदानामुळे देश अधिक न्याय्य, सर्व समावेशक आणि समतोल समाजाच्या दिशेनं वाटचाल करत असल्याचं उपराष्ट्रपतींनी म्हटलं आहे. मुंबईत चैत्यभूमी इथं राज्यपाल जिष्णुदेव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी बाबासाहेबांना अभिवादन केलं. मुंबईसह राज्याच्या विविध भागातून अनुयायी चैत्यभुमीवर दाखल होत आहेत.

याठिकाणी बाबासाहेबांना शासकीय मानवंदना देऊन, हेलिकॉप्टर मधून पुष्प वृष्टी करण्यात आली. मुख्यमंत्र्यांनी यावेळी बोलताना नागरीकांना आंबेडकर जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. बाबासाहेब आंबेडकर यांचं महत्त्व आणि त्यांनी देशासाठी दिलेलं योगदान मुख्यमंत्र्यांनी अधोरेखित केलं. ते म्हणाले..

डॉ.आंबेडकर जयंती/विदर्भ

नागपुरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त इंदोरा बुद्ध विहारातून 'धम्म ज्योत मिरवणूक' उत्साहात काढण्यात आली. मिरवणूक विविध मार्गानं संविधान चौकात पोहोचून मध्यरात्री जय भीमच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला. हजारो अनुयायांच्या उपस्थितीत ढोल-ताशे, गुलाल आणि फटाक्यांनी उत्सव साजरा झाला. ऐकुया हा विशेष रिपोर्ट आमच्या प्रतिनिधींकडून...

*नागपूरच्या ऐतिहासिक दीक्षाभूमी इथं महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बाबासाहेबांना अभिवादन केलं. यावेळी 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर टुरिस्ट सर्किट' अंतर्गत दोन विशेष बसेस त्यांच्या उपस्थितीत दीक्षाभूमीवरून रवाना करण्यात आल्या. यावेळी माध्यमांशी बोलताना दीक्षाभूमीच्या विकासासाठी राज्य सरकारने ११८ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून नागपूर महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण आणि जिल्हाधिकारी यांच्या माध्यमातून अंतिम नियोजन सुरू असल्याची माहिती बावनकुळे यांनी दिली. तसच चिचोली येथील शांतीवनमध्ये ४० कोटी रुपयांच्या प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असून नागपूरमधील विविध पर्यटन स्थळांचा विकासही शासनाच्या निधीतून केला जाणार आहे. दरम्यान, सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून नागपुरात आयोजित करण्यात आलेल्या 'सामाजिक सप्ताह' कार्यक्रमाचा आज समारोप झाला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त नागपूर आकाशवाणी आणि दूरदर्शन अनुसूचित जाती आणि जमाती कर्मचारी कल्याण संघटनेतर्फे आकाशवाणी परिसरात सकाळी 11 वाजेपासून भोजनदानाचं आयोजन करण्यात आलं. याप्रसंगी जिव्हाळा आश्रमच्या विद्यार्थिनींना स्पर्धात्मक पुस्तकांचे वितरण आकाशवाणी नागपूरच्या उपमहासंचालक मनीषा शेटे तसेच आकाशवाणीतील अधिकारी कर्मचारी यांच्या हस्ते करण्यात आलं. नागपूर महानगरपालिका,जिल्हाधिकारी कार्यालय,विभागीय आयुक्त कार्यालय, महावितरणसह*

*अनेक सरकारी आणि खासगी संस्था याठिकाणी अभिवादनपर कार्यक्रम आयोजिण्यात आले. अकोल्यातील मूर्तिजापूर इथं जयंतीनिमित्त मध्यरात्री उत्साहात जल्लोष साजरा करण्यात आला. रात्री १२ वाजता फटाक्यांची आतषबाजी, "जय भीम"च्या घोषणां आणि केक कापून कार्यक्रम साजरा झाला. याशिवाय 'भीमगर्जना' या सांस्कृतिक कार्यक्रमातून संगीतमय मानवंदना देण्यात आली. बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर तालुक्यातील वरखेड इथं मुख्याध्यापक अलकनंदा परिहार यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त आकर्षक रांगोळी साकारत महापुरुषांच्या विचारांची जपणूक करण्याचा संदेश दिला.संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ इथं डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त भव्य रॅली काढत 'समता सप्ताहा'चा समारोप करण्यात आला. कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या उपस्थितीत विविध प्रबोधनात्मक उपक्रम, ग्रंथवाटप आणि अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात येऊन विद्यार्थ्यांमध्ये समतेचा संदेश रुजविण्याचा प्रयत्न करण्यात आला.चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक वुईके यांनी चंद्रपूर शहरातील डॉ.आंबेडकर यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून अभिवादन केल. याप्रसंगी सामाजिक न्याय विभागाच्या वतीने काढण्यात प्रभातफेरी काढण्यात आली. वाशिम शहरामध्ये देखील विविध कार्यक्रमांच आयोजन करण्यात आल. शहरातील विविध बुद्ध विहारांमध्ये त्रिशरण, बुद्ध वंदना घेण्यात आली. मुख्य कार्यक्रम डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मैदानात पार पडला. (आकाशवाणीसाठी वृत्तविभागातून मी हेमांगी कुलकर्णी)*

राष्ट्रपती दौरा

नागपूरच्या **AIIMS** चा दुसरा दीक्षांत समारंभ उद्या **15** एप्रिल रोजी आयोजित करण्यात आला असून, प्रमुख पाहुण्या म्हणून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यात एकूण **210** विद्यार्थ्यांना पदवी आणि सुवर्ण पदके प्रदान करण्यात येणार आहेत. सोहळ्याला राज्यपाल जिष्णु देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव, एम्स नागपूरचे अध्यक्ष डॉ. अनंत पांढरे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहतील. याशिवाय राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उद्या प्रत्यक्ष कर अकादमीत भारतीय महसूल सेवेच्या **78** व्या तुकडीच्या प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांच्या समारोप सोहळ्याला प्रमुख पाहुण्या म्हणून

देखील उपस्थित राहणार आहेत. **78** व्या तुकडीत **130** अधिकाऱ्यांचा समावेश असून प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर हे अधिकारी सहाय्यक आयकर आयुक्त म्हणून देशभर नियुक्त केले जातील. गुरुवार दिनांक **16** एप्रिल रोजी राष्ट्रपती वर्धा स्थित महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्व विद्‌यालयाच्या दीक्षांत समारंभाला उपस्थित राहणार असून त्यानंतर त्या सेवाग्राम येथील गांधी आश्रमाला भेट देतील.

<u>उपवर्गीकरण</u>

राज्यातील अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या अनुषंगानं निवेदन किंवा अर्ज सादर करण्यासाठी ३० एप्रिल २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिली. अनुसूचित जातीच्या आरक्षणात उपवर्गीकरण संदर्भात न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त एक सदस्यीय समितीनं १६ मार्चला आपला अहवाल शासनाला सादर केला होता. या समितीसमोर अहवालाबाबत मते मांडण्यासाठी किंवा आक्षेप नोंदवण्यासाठी इच्छुकांना ई-मेलद्‌वारे नोंदणी करण्यासाठी यापूर्वी १५ एप्रिल पर्यंत मुदत देण्यात आली होती. मात्र ही मुदत आता ३० एप्रिल पर्यंत वाढवण्यात आली आहे.

<u>मानव-वन्यजीव संघर्ष</u>

राज्यात सध्या मानव-वन्यजीव संघर्ष गंभीर स्वरूप धारण करत असून, त्यावर तोडगा काढण्यासाठी शासनाकडून ठोस पावले उचलली जात असल्याच राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी सांगितलं. ते आज नागपुरात माध्यमांशी बोलत होते. जंगलातील अनावश्यक वाढलेल्या वनस्पतींचे निर्मूलन करून तेथे हिरवळ वाढवण्याचं नियोजन करण्यात येत आहे. तसच वाघांची वाढती संख्या लक्षात घेता त्यांचं शास्त्रीय पद्‌धतीनं स्थलांतर करण्याबाबतही सखोल अभ्यास सुरू आहे, असं ते म्हणाले. या संदर्भातील सविस्तर अहवाल लवकरच मुख्यमंत्री आणि वनमंत्र्यांकडे सादर केला जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

## वाचनालय

भंडारा जिल्ह्यातील नगरपंचायत वाचनालय लाखांदूरच्या नविन इमारतीचा लोकार्पण सोहळा आज उत्साहात पार पडला. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते या अभ्यासिका आणि वाचनालयाचं लोकार्पण करण्यात आलं. या कार्यक्रमाला पालकमंत्री पंकज भोयर यांची प्रमुख उपस्थिती होती. नवीन वाचनालयामध्ये विद्यार्थ्यांसाठी अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून, एकूण ७० आसन क्षमतेची बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. सध्या या वाचनालयामध्ये दररोज सुमारे १२० विद्यार्थी विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करत आहेत. त्याचप्रमाणे लाखांदूर येथील नवीन पोलीस स्टेशन इमारतीच लोकार्पण देखील बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आलं.

## हवामान

हवामान! विदर्भात उष्णतेचा पारा दिवसेंदिवस वाढत असून आज अकोल्यात ४४ अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली आहे. मागील आठवड्यापासून अकोला, अमरावती, वर्धा आणि यवतमाळ इथं सातत्यानं उच्चांकी तापमानाची नोंद करण्यात येत आहे. पुढील काही दिवस उष्णतामान कायम राहणार असून नागरिकांनी वाढत्या उन्हापासून स्वसंरक्षण करण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. दरम्यान नागपुरात आज **41** पूर्णांक **8** दशांश अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदवण्यात आलं.

*****